रंगभूमी नियतकालिक

# रंगवाचा



**एका नटाची नटराजासाठी प्रार्थना.....**

आसपास असू दे भारलेला
नाटकाचं पहिलं वाचन ऐकण्याआधीच
शरीराभोवती माझ्या अनोळखी
सळसळू दे काही खळबळू दे
का ? कोण ? कशासाठी ? कुठवर ?
अशा अनेक प्रश्नांसोबत वाचनात
कंसांनी साऱ्या घेऊ दे कवेत आपोआप
शिरतांना रिहर्सलच्या घनदाट अरण्यात
घड्याळाचे काटे अडकूदेत एकमेकात
रिकाम्या खिशातली पोकळी
विसरू दे घराचा चौकोन
राहू दे सारं उभं आठवण्यापल्याड अरण्याच्या
धावू दे शोधत मृगजळ तरी
सापडू दे निदान एकतरी ठिकाण
रोज नवं
प्रयोगाआधी नेहमीच

- सौमित्र

वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठानचे मुखपत्र
रजि. नं. एफ-१२५ (सिंधुदुर्ग)
वर्ष पहिले-अंक पहिला
फेब्रुवारी २०१७
किंमत ₹ पन्नास